# 'बिटस् पिलानी' मध्ये वार्षिक परिषद

## आशियातील वाचन व लेखन संघटनेतर्फे आयोजन

## जगातील १२० वैज्ञानिक व शैक्षणिक विद्वानांचा सहभाग



**सांकवाळ : आशियातील वाचन व लेखन संघटनेच्या वार्षिक परिषदेत प्रा. विकी बथ्स, प्रा. मलानेशा जोशी, प्रा. जी. रघुरामा, प्रा. कॅथरीन मॅकब्रिज, डॉ. पूजा, नकामुरा, डॉ. जुली वॉशिंग्टन यांच्यासमवेत शास्त्रज्ञ व शैक्षणिक विद्वान**

प्रतिनिधी
वास्को

सांकवाळ येथील बिटस् पिलानी के. के. बिर्ला गोवा कॅम्पसच्या जीवशास्त्र विभागाच्या न्युरोसायन्स लॅबतर्फे आशियातील वाचन व लेखन संघटनेच्या तिसऱ्या वार्षिक परिषदेचे आयोजन केले होते.

बिटस् पिलानी गोवा कॅम्पसचे जीवशास्त्र विज्ञान विभागाचे प्रा. विकी बथ्स व युएसए येथील टेक्सास ए ॲण्ड एम युनिव्हर्सिचे प्रा. मलानेशा जोशी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. बिटस् पिलानी गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. जी. रघुरामा यांनी प्रास्ताविक केले तर आशियातील वाचन व लेखन संघटनेचे अध्यक्ष प्रा. कॅथरिन मॅकब्रिज यांचे उद्‌घाटनीय भाषण झाले.

या परिषदेत पहिल्या दिवशी डॉ. पूजा नकामुरा यांचे तर दुसऱ्या दिवशी डॉ. ज्युली वॉशिंग्टन यांनी व्याख्यान दिले. दोन दिवसीय परिषदेत जगातील सुमारे १२० वैज्ञानिक व शैक्षणिक विद्वानांनी भाग घेतला होता.

या परिषदेत शब्दलेखन, मूल्यांकन, तांत्रिक शिक्षण, द्विभाषिकता, स्मरणशक्ती व अस्खलितपणा, संशोधन व शिक्षणातील अंतर, वाचनातील लक्ष्य व कार्य, वाचनातील तांत्रिक हस्तक्षेप, लेखन वाचन, भाषेचा अभ्यास, वाचन व शिक्षण तंत्र, ऑर्थोग्राफीक प्रक्रिया, बोली व बहुभाषिकता, अभ्यासक्रम व सूचना, ऑर्थोग्राफीक जागृती व शब्दलेखन, संस्कृतीवरील वाचन आदी विषय चर्चेसाठी घेण्यात आले.

या परिषदेत विविध शास्त्रज्ञांनी २३ पोस्टर्स सादर केले. या परिषदेतील सहभागींच्या विविध प्रतिक्रिया व संशोधनावरील चर्चेनंतर परिषदेची सांगता झाली.

**वाचन व लेखन समृद्धी ...**

- डॉ. पूजा नकामुरा, डॉ.ज्युली वॉशिंग्टन यांचे व्याख्यान
- विविध शास्त्रज्ञांतर्फे २३ पोस्टर्सचे सादरीकरण